# वीज बिलासाठी अदानी इलेक्ट्रिसिटीच्या व्याजमुक्त ईएमआय सुविधेला मुदतवाढ

**मुंबई :** ग्राहकांच्या बिलांबाबतच्या चिंता दूर करण्यासाठी अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबईने राबवलेल्या व्याजमुक्त ईएमआय सुविधेला ३० ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या मुदतवाढीमुळे ग्राहक आता बिले भरण्यासाठी ईएमआय पर्यायाचा वापर करू शकतात.

कोरोना काळात ग्राहकांच्या सुविधेसाठी अदानी इलेक्ट्रिसिटीने व्याजमुक्त ईएमआय सुविधा सुरू केली होती. २३ ऑक्टोबर ते ३० ऑक्टोबर या काळासाठी मुदतवाढ दिली आहे. एईएमएलचे सर्व ग्राहक आपली थकबाकीची रक्कम भरण्यासाठी तीन मोफत ईएमआय उपलब्ध करून घेण्यास पात्र आहेत. यापूर्वी ईएमआय सुविधेचा पर्याय न स्वीकारलेले एईएमएल ग्राहक आता एईएमएलच्या वेबसाईटवरील, कॉल सेंटरवरील किंवा ग्राहक सेवा केंद्रावरील एईएमएल किऑस्कवर जाऊन या सुविधेसाठी नोंदणी करू शकतात. मात्र संयुक्त बिले किंवा एकत्रित बिले प्राप्त करणाऱ्या ग्राहकांना ईएमआय सुविधा लागू नाही.

सध्या लॉकडाऊनच्या काळात ग्राहकांना जास्तीत जास्त लाभ देण्याच्या हेतूने व्याजमुक्त ईएमआय पर्यायाला केवळ सध्याच्या महिन्यापुरती मुदतवाढ दिली आहे. यापूर्वीच्या ईएमआय सवलतीला सर्व ग्राहक वर्गातून सकारात्मक प्रतिसाद मिळाला. अदानी इलेक्ट्रिसिटीच्या अधिकृत वेबसाईटला भेट देऊन ईएमआय पर्याय स्वीकारू शकतात. यासाठी क्विक पे ऑप्शन/एईएमएल ॲप/ किऑस्क हेल्पलाईन क्रमांकावरही ग्राहक संपर्क करू शकतात, असे सांगण्यात आले आहे. तर नेट बँकिंग, डेबिट कार्ड किंवा किऑस्क अथवा ग्राहक सेवा केंद्रावर रोख भरणा करण्याचा पर्याय देण्यात आला आहे.